महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik - 422 004
Phone : 0253-2539171 / EPABX: 0253-2539100 / 300 / Fax: 0253-2539231 (CET)
E-mail: registrar@muhsnashik.com sw@muhsnashik.com Web: www.muhsnashik.com

डॉ. जे. डी. पाटील एम.डी.(होम)
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग व
राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक
दुरध्वनी : २५३९१७०

मआविवि/डब्ल्यु .२.३ए/२७०/२००६ — दि. ०१ ऑगस्ट २००६

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य,
लोकनेते राजारामबापू पाटील
आयुर्वेद मेडिकल कॉलेज, इस्लामपूर सांगली रोड,
ता. वाळवा जि. सांगली

**विषय : राष्ट्रीय सेवा योजनेचे नविन एकक (N.S.S. Unit) देणेबाबत.**

**संदर्भ : आपले पत्र क्र. ४३३/०३/२००६.** दि ०४।०३।०६.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांसंबंधी, संदर्भांकित पत्राद्वारे आपल्या महाविद्यालयाने नव्याने राष्ट्रीय सेवा योजना एककाची (N.S.S. Unit) मागणी केली आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयास ५० विद्यार्थी संख्येची मान्यता देवून राष्ट्रीय सेवा योजना एकक सन २००६-०७ पासून सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदर राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक सुरु करण्यापूर्वी आपणांस खालील बाबींची पूर्तता करणे गरजेचे आहे.

१. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (पुरुष) सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (महिला) हे प्रपाठक (Reader) / व्याख्याता (Lecturer) स्तरावरचे असावेत तसेच त्यांना राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) बाबत माहिती असणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात कमीत कमी ३ वर्षे काम करणे बंधनकारक राहिल. त्यांचे नियुक्ती पत्र व ३ (तीन) वर्षे काम करण्याचे हमी पत्र विद्यापीठास पाठवावे.

TRUE COPY

Loknete Rajarambapu Patil Ayurvedic
Medical College, Hospital, Post Graduate
Institute & Research Centre, Urun-Islampur
Tal.Walwa, Dist.Sangli. 415 409

३. कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांची माहिती तसेच आपल्या महाविद्यालयास राष्ट्रीय सेवा योजनेसाठी मंजूर करण्यात आलेली विद्यार्थ्यांची (मुले/मुली) नावांची यादी सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार विद्यापीठास त्वरीत पाठवावी.

४.राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यास नियमीत कार्यक्रमाचे दोन (२) वर्षे (१२० तास प्रति विद्यार्थी प्रति वर्ष पूर्ण करणे.) तसेच नियमीत कार्यक्रमास मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येच्या ५० % म्हणजे २५ विद्यार्थ्यांचे दहा (१०) दिवसांच्या विशेष शिबीर कार्यक्रमात सहभागी होणे बंधनकारक राहिल. सदर पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच त्यांच्या अंतिम परिक्षेत अतिरीक्त गुणांचा लाभ देण्यात येईल याची प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांनी विशेष नोंद घ्यावी.

५.रासेयोचे नियमीत कार्यक्रम व विशेष कार्यक्रम घेण्याविषयीची माहिती परिशिष्टच्या (Appendix) स्वरुपात जोडलेली आहे. तरी सदर माहितीच्या अनुषंगाने कार्यक्रम राबवावे व त्याचा अहवाल सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार दिलेल्या कालावधीत विद्यापीठास पाठवावा.

६.दरवर्षी आपल्या महाविद्यालयास देण्यात येणाऱ्या अनुदानाचा आर्थिक वर्षाचा हिशोब एप्रिल महिन्याअखेर पर्यंत ऑडिट करुन लेखा परिक्षकाच्या (सी.ए.) सहीने विद्यापीठास पाठवावे. सदर हिशोब वेळेत प्राप्त न झाल्यास आपल्या महाविद्यालयाने सदर वर्षाचे अनुदान खर्च केले नाही असे समजून सदर अनुदान आपणाकडून परत घेण्यात येईल व आपले महाविद्यालयातील एकक अकार्यक्षम समजून बंद करण्यात येईल. कृपया याची प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

तरी वरील सर्व बाबींची पूर्तता करुन सदर माहिती विद्यापीठास दि.१६/०१/२००६ पर्यंत पाठवावी.

24/08/2006

आपला,

डॉ. जे.डी. पाटील
**संचालक (विद्यार्थी कल्याण) व**
**राष्ट्रीय सेवा योजना समन्वय**

सोबत :-

१. Appendix A to G
२. Action Plan (कृती आराखडा)
३. Account Format (हिशोब सादर करण्याचा नमुना)

TRUE COPY
Dean
Loknete Rajarambapu Patil Ayurvedic
Medical College, Hospital, Post Graduate
Institute & Research Centre, Urun-Islampur
Tal.Walwa, Dist.Sangli. 415 409